# एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समिती, रायगड

पत्ता : हरिभाऊ कॉम्प्लेक्स, पहिला माळा, कोप्रोली नाका, मु. पो. कोप्रोली, ता. उरण, जि . रायगड (संपर्क-9819238522 /8108075746)

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | सरचिटणीस |
|---|---|---|
| श्री. सुधाकर पाटील (Ex IRS) | श्री. संतोष ठाकूर | श्री. रुपेश पाटील |

प्रमुख मार्गदर्शक
श्री. बी. जी. कोळसे-पाटील
माजी न्यायमूर्ती

कायदेशीर सल्लागार
ॲड. मेघनाथ पाटील
ॲड. डी. के. पाटील

उपाध्यक्ष
श्री. लवेश म्हात्रे
श्री. गोपाळ जोशी
श्री. चंद्रशेखर ठाकूर
ॲड. भास्कर पाटील
श्री. एम. के. म्हात्रे
श्री. हिरामण मोकल

समन्वयक
ॲड. सत्यवान भगत

खजिनदार
श्री. रोशन ठाकूर

कायदेशीर सहाय्यक
ॲड. दत्तात्रेय नवाले
ॲड. प्रसाद पाटील
ॲड. निनाद नाईक
ॲड. धीरज डाकी
ॲड. योगेश म्हात्रे

सल्लागार
श्री. महेंद्र ठाकूर
श्री. सुरेश पाटील
डॉ. सुभाष घरत
श्री. रमाकांत जोशी
श्री. विनोद म्हात्रे
श्री. बी. एन. डाकी
श्री. विद्याधर मुंबईकर
श्री. रमाकांत पाटील

विभाग प्रमुख
श्री. राजाराम जोशी
श्री. मनोज पाटील
श्री. प्रशांत म्हात्रे
श्री. प्रकाश शिवकर

सहसचिव
श्री. प्रकाश पाटील

सहखजिनदार
श्री. जयवंत पाटील

## सोन्याचे मोल असणाऱ्या जमिनी, मातीमोल किमतीने विकू नका !

### शेतकरी बंधूंनो,

शासनाने २००३ पासून पाच वेळा आपल्या विभागात विविध प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न केला आहे. २००६ साली तर रिलायन्सच्या महामुंबई एसईसडेच्या नावाखाली आपल्या जमिनी कवडीमोल किमतीने बळकाविण्याचा आणि आपल्याला येथून स्थलांतरित करण्याचा प्रयत्न झाला. त्या विरोधात आपण पाच वर्षे न्यायालयात आणि रस्त्यावर तीव्र लढा दिला आणि त्या प्रकल्पालाच हद्दपार करुन टाकले. तो लढा ऐतिहासिक होता.

आता पुन्हा तिसऱ्या मुंबईच्या नावाखाली आपल्या जमिनी बळकावण्याचा सरकारने चंग बांधला आहे. त्यासाठी काही दलाल शेतकऱ्यांची दिशाभूल करुन त्यांना जमीन विकण्यास भाग पाडत आहेत; तरुणांना मोहाच्या जाळ्यात अडकवत आहेत. कृपया त्यास बळी पडू नका.

सभोवतालच्या विकासामुळे आणि विशेषतः अटल सेतुमुळे आपल्या विभागातील जमिनीचे मूल्य अमाप वाढले आहे. आपल्या लगतच्या जेएनपीटी आणि नवी मुंबई परिसरात आज जमिनीचा एका गुंठ्याचा भाव एक कोटी रुपयांच्या वर गेला आहे. इतकेच काय एनएचआयए महामार्ग बाधित शेतकरी न्यायालयात गेल्यामुळे सरकारनेच त्यांना एका गुंठ्याला अठ्ठावन्न लाख ऐंशी हजार रुपयांचा (५८,८०,०००/-) मोबदला दिला आहे. (जिल्हाधिकारी, रायगड यांचा आदेश क्र. भूसंपादन/टें-६ दर निश्चिती NH 4B/२०१७ दि. २०.११.२०१७).

शेतकरी बांधवांनो, आपल्या विभागात जमिनी खरेदी करणारे बाहेरचे लोक (पार्टीवाले) वेडे नाहीत. आपल्या जमिनी स्वस्तात घेवून, भविष्यात तेच फायदा उठविणार आहेत. कारण काही वर्षांनी येथील जमिनीला प्रचंड भाव मिळणार आहे. याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. म्हणून आपल्या वाडवडिलांपासून आपल्या उपजिवीकेचे साधन असणाऱ्या जमिनी दोन-चार लाख गुंठा भावाने विकू नका, दलालांच्या भूलथापांना बळी पडू नका! आपल्याला, विशेषतः तरुणांना आमची कळकळीची विनंती आहे की, आपल्या आजोबा-पणजोबांनी जीवापाड जोपासलेली आपली काळी आई कवडीमोल किमतीला विकू नका, जरा धीर धरा, एमएमआरडीए विरोधी संघर्षात सामील व्हा , संघर्ष करून आपण न्याय मिळवू हा आम्हाला विश्वास आहे. कृपया हे पत्रक वाचा आणि दुसऱ्यांनाही वाचायला द्या.

आपले विश्वासू,

| रुपेश पाटील | संतोष ठाकूर | सुधाकर पाटील (Ex IRS) |
|---|---|---|
| सरचिटणीस | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |